**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** ठाणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** वाशिंद पोलीस स्टेशन

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0155 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**20/07/2023 02:42

| 2. | S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|---|
| | 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 19/07/2023
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/07/2023
**Time From (वेळेपासून):** 14:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:35 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 20/07/2023 **Time (वेळ):** 02:20 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 007

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/07/2023 02:20 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** **Beat No. (बिट क्र.):**

उत्तर, 13 किमी

**(b) Address (पत्ता):** पिवळी , वाशिंद ताशहापुर ,जि ठाणे

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** प्रमिला पथ्वीराज गढरी

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1973

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्यांचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शंकर पार्वती दर्शन निवास,रेल्वे क्वार्टर जवळ,मोरदेव नगर वाशिंद पुर्व,ता शहापुर जि ठाणे,वाशिंद पोलीस स्टेशन,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शंकर पार्वती दर्शन निवास,रेल्वे क्वार्टर जवळ,मोरदेव नगर वाशिंद पुर्व,ता शहापुर जि ठाणे,वाशिंद पोलीस स्टेशन,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8830168030

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या/संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | डॉ.रेखा श्रावण सोनावणे | | | 1. वैदयकिय अधिकारी, प्राथमिक आरोग,केंद्र, पिवळी गाव ता शहापूर ,वाशिंद पोलीस स्टेश ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs) (मुल्य (रू.) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 20/07/2023

मी, प्रमिला पृथ्वीराज गढरी, वय 50 वर्ष व्यवसाय:- नोकरी, आरोग्य सेविका, प्राथमिक आरोग्य केंद्र, अघई अंतर्गत उपकेंद्र पिवळी ता.शहापूर जि.ठाणे रा.शंकर पार्वती दर्शन निवास रेल्वे क्वार्टर जवळ मोरदेव नगर वाशिंद पुर्व ता.शहापूर जि.ठाणे मोबाईल नंबर 8830168030 समक्ष वाशिंद पोलीस स्टेशन, ठाणेग्रामिण येथे हजर राहून फिर्याद देते की,

मी, वरील प्रमाणे असून वरील ठिकाणी माझे कुटूंबियासह राहण्यास आहे. मी प्राथमिक आरोग्य उपकेंद्र पिवळी ता.शहापूर जि.ठाणे येथे आरोग्य सेविका म्हणून सुमारे 4 वर्षापासून नेमणूकीस आहे.

मी काम करीत असलेल्या प्राथमिक आरोग्य उप केंद्रामार्फत किशोरवयीन मुलां-मुलींना आरोग्य विशयक मार्गदर्शन करणेसाठी त्यांच्या सभा घेण्यात येतात. त्यावेळी मुलांना चहा-नाष्ट्याचा खर्च हा आरोग्यविभाग जिल्हापरिषद यांचेकडून निधी म्हणून प्राप्त होतो. त्याप्रमाणे मी कार्यरत असलेल्या उपकेंद्राकरीता दिनांक 10/04/2023 रोजी रू. 22,000/- इतका निधी हा राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य अभियान, प्राथमिक आरोग्य पिवळी उपकेंद्र शहापूर यांचे बँक ऑफ इंडीयाचे खाते क्र.11419503623 यामध्ये प्राप्त झालेला आहे. सदर बँक खात्याची झेरॉक्स प्रत यासोबत जोडलेली आहे. सदरचा निधी प्राप्त झाल्यानंतर तो नमूद खात्यातून काढण्याचा अधिकार हा पिवळी गावचे सरपंच तसेच मला आहे.

मी काम करीत असलेल्या आरोग्य केंद्रामध्ये डॉ.रेखा श्रावण सोनावणे, वैद्यकीय अधिकारी हया दिनांक 16/07/2023 पासून कार्यरत आहेत. तसेच त्यांचेकडे प्राथमिक आरोग्य केंद्र अघई ता.शहापूर यांचा देखील चार्ज मागील चार वर्षापासून आहे.

दि.17.7.2023 रोजी डॉ.रेखा सोनावणे प्राथमिक आरोग्य केंद्र पिवळी यांनी मला वरीलप्रमाणे शासनाकडून प्राप्त झालेली निधी रू.22,000/- ही बेकायदेशीररित्या पावत्या सादर करून काढण्यास सांगून, सदर रक्कमेतील अर्धी रक्कम रू.11000/- त्यांना देण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांना बेकायदेशीर काम करण्यास नकार दिला असता, त्यांनी मला "तुमचे वार्षिक गोपनिय शेरे लिहिण्याचा अधिकार मला आहे. त्यामुळे तुमचे वार्षिक गोपनिय शेरे खराब करून तुम्ही आरोग्य केंद्रामध्ये व्यवस्थित काम करीत नाही." म्हणून तुमचा वरिष्ठांना अहवाल सादर करीन. त्यामुळे तुमचे वार्षिक शेरे चांगले लिहिण्यासाठी तसेच वरिष्ठांकडे तक्रार न करण्यासाठी माझेकडे रू.11,000/- इतक्या रक्कमेची लाचेची मागणी केली. त्यावेळी मी डॉ.रेखा सोनावणे यांना त्यांनी मागितलेप्रमाणे रक्कम देणार नाही असे सांगितले असता, त्यावेळेपासून मला घालून पाडून बोलून मला मानसिक त्रास देत आहेत.

तथापी, मला वैदयकिय अधिकारी डॉ.रेखा सोनावणे यांना 11,000/-रु. लाचेची रक्कम दयावयाची इच्छा नसल्याने, मी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे दिनांक 18/07/23 रोजी लेखी तक्रार दिली.

मी दिलेल्या लाचेच्या तक्रारीच्या अनुषंगाने ठाणे अॅन्टी करप्शन ब्युरो येथील पोलीस निरीक्षक श्री.स्वप्निल जुईकर यांनी दि.19/07/2023 रोजी मला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून, पंच साक्षीदारासह प्राथमिक आरोग्य केंद्र, पिवळी ता.शहापूर जि.ठाणे येथे पाठवुन पडताळणी कारवाई केली असता, त्याठिकाणी वैदयकिय अधिकारी डॉ.रेखा सोनावणे यांनी पंच श्रीमती कल्पना सोनोने यांचे समक्ष डॉ.रेखा सोनावणे यांनी माझेकडे शासकीय निधीमधील रू.22,000/- बाबत खोटया पावत्या सादर करून रू.11,000/- दयावे लागतील असे बोलून लाचेची स्पष्ट मागणी केली.

पडताळणीमध्ये वैदयकिय अधिकारी यांनी रू. 11,000/- लाचेची मागणी केल्याने, मी पडताळणी पथकाजवळ परत आल्यानंतर, पडताळणीमधील आवश्यक ते संभाषण पोलीस निरीक्षक जुईकर साहेब यांनी पंचांसमक्ष ऐकले असता, त्यामध्ये डॉ.रेखा सोनावणे हया स्पष्टपणे लाचेची मागणी करीत असल्याचे दोन्ही पंचांसमक्ष निष्पन्न झाले. त्यानंतर पोलीस निरीक्षक जुईकर योंचे सूचनेवरून मी माझेकडील बचती मधील 11,000/-रूपये (500 रू. भारतीय चलनी दराच्या 22 नोटा) रक्कम हजर केल्यानंतर, सापळा पूर्व पंचनाम्याची पंचांसमक्ष कारवाई केल्यानंतर

लाचेची रक्कम व सोबत डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर घेवून मी प्राथमिक आरोग्य केंद्र पिवळी येथे जावून डाॅ. रेखा सोनावणे यांची भेट घेतली असता, त्यांनी मला इशा-याने तेथीलच डिलेव्हरी रूममध्ये येण्यास सांगितले. त्यावेळेस मी माझेकडील पर्समधील प्लास्टीकच्या डब्बीत असणारी लाचेची रक्कम रू.11,000/- ही उजव्या हाताने काढून त्यांचेकडे दिली असता, त्यांनी ती सदरची लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारली. त्यानंतर त्यांनी माझेकडे कागदाची मागणी केली व लगेचच त्यांनीच शेजारील टेबल जवळील केसपेपरचा कागद घेवून माझेकडील लाचेची रक्कम दोन्ही हाताने सदर कागदात गुंडाळून ठेवून घेतली. त्यावेळेस मी लागलीच प्राथमिक आरोग्य केंद्र पिवळी कार्यालयातून बाहेर येवून सापळा पथकास दिसेल अशा रितीने माझे डाव्याहाताने चष्मा काढून लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत सापळा पथकास दिसेल असा पुर्व नियोजित इशारा केला. त्यावेळेस माझे मागोमाग असलेल्या सापळा पथकाने वैदयकिय अधिकारी डाॅ.रेखा सोनावणे यांना लाचेच्या रक्कमेसह 14.35 वाजता ताब्यात घेतले.

तदनंतर केलेल्या तपासणीत लोकसेविका वैदयकिय अधिकारी डाॅ.रेखा सोनावणे यांचे टेबलावर एका केसपेपरच्या कागदात लाचेची रक्कम रूपये 11,000/- मिळून आली. ती ताब्यात घेण्यात आली.

अशा प्रकारे प्राथमिक आरोग्य केंद्र, पिवळी ता.शहापूर जि.ठाणे येथील वैदयकिय अधिकारी डाॅ. रेखा श्रावण सोनावणे यांनी त्यांचे स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून बेकायदेशीर मार्गाने स्वतःचा अर्थिक फायदा करून घेणेकरीता, दिनांक 19/07/2023 रोजी माझेकडे शासनाकडून प्राप्त झालेली निधी रू.22,000/- ही बेकायदेशीरित्या पावत्या सादर करून काढण्यास सांगून, सदर रक्कमेतील अर्धी रक्कम रू.11,000/- त्यांना देण्यास सांगून 11,000/-रू. लाचेची मागणी करून, सदर लाचेच्या रक्कमेचा स्विकार केला म्हणुन माझी डाॅ.रेखा श्रावण सोनावणे, वैदयकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्यकेंद्र, पिवळी गाव ता.शहापूर जि.ठाणे यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन तीची प्रिंट काढल्यानंतर ती मला वाचुन दाखवली असता ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष — हे लिहून दिले सही

(स्वप्निल जुईकर)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे

सदर गुन्ह्याचा तपास पोनि स्वप्निल जुईकर नेम अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे हे करीत आहेत.

**Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Ghansham Ramchandra Adhav(I (Inspector)) /

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Madhi

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Ghansham Ramchar

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**

11/ 2540

ठाणे अंमलदार
वासिंद पोलिस स्टेशन